# थोर समाजसेवक

डॉ. लीला पाटील



परी प्रकाशन

**थोर समाजसेवक**

◆ ____________

© सुरक्षित

◆ ____________

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ____________

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ____________

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ____________

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ____________

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | बाबा आमटे | ३ |
| २. | कर्मयोगी अण्णा हजारे | १९ |
| ३. | डॉ. प्रकाश आमटे | ३६ |
| ४. | क्रांतिवीर नागनाथ नायकवडी | ५२ |
| ५. | मेधा पाटकर | ६८ |
| ६. | सिंधूताई जोशी | ८५ |
| ७. | सिंधूताई सपकाळ | १०२ |
| ८. | महर्षि अण्णासाहेब पटवर्धन | ११९ |
| ९. | विजया लवाटे | १३५ |
| १०. | दलितमित्र तांबटकाका | १५२ |



# बाबा आमटे

मुरलीधर देविदास आमटे म्हणजेच ख्यातनाम बाबा आमटे. यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे २६ डिसेंबर १९१४ रोजी झाला. आठ भावंडांपैकी ते एक. त्यांचं घराणं जमीनदाराचं. वरोड्याजवळच्या गोरज या खेड्यात त्यांची साडेचारशे एकर जमीन होती. घरची सांपत्तिक स्थिती उत्तम. शिवाय वडील सरकारी खात्यात चांगल्या पदावर नोकरीला होते. सर्वच दृष्ट्या आमटे घराणे प्रतिष्ठित, प्रसिद्ध व सधन.

बाबा आमटे यांचे वडील जुन्या मतांचे. प्रतिष्ठेविषयी परंपरागत कल्पना. नोकरांच्या मुलांबरोबर खेळायचं नाही. खायचं-प्यायचं नाही. कुठल्याही बाबतीत रूढी-परंपरेच्या चाकोरीबाहेर जायचं नाही असा त्यांचा दंडक. वेगळा विचार, वेगळं मत, वेगळा आचार म्हणजे बंडखोरीच. मात्र बाबांची आई-लक्ष्मीबाई स्वतंत्र वृत्तीच्या. त्यांच्यासंबंधी बाबांनी एके ठिकाणी म्हटलंय, ''बंडखोरीचे जंतू तिच्याच रक्तातून माझ्यात आले असावेत.'' एका घरगुती प्रसंगातून लक्ष्मीबाईंच्या मनाला जबरदस्त धक्का बसला आणि आपल्या नवऱ्याने आपल्यावर अविश्वास दाखवला अशी त्यांची समजूत झाली. त्याचा परिणाम इतका झाला की त्यांना वेड लागले; पण वेडाची झळ नवऱ्यापुरतीच मर्यादित होती. तरीही अशी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात बाबा आमटे वाढले.

बाबा आमटे यांचे वडिलांशी फारसे कधी पटलेच नाही. लहान वयापासून त्यांना चाकोरीबाहेर प्रश्न पडायचे. आपली शेती एवढी मोठी पण कसणाऱ्यांच्या वाट्याला दरिद्री जीवन का ? आपल्या बरोबरीची शाळेतील मुलं ही खालच्या जातीची म्हणून त्यांच्यात मिसळायचं नाही, त्यांच्या घरी जेवायला नाही हे का ? हे उच्चनीच असे माणसा-माणसांमध्ये भेद कुणी केले ? का केले ? सभोवती जे जे अन्यायकारक, विषमतादर्शक, जातिभेदसूचक दिसे त्या त्या गोष्टीबद्दल बालवयात बाबांना प्रश्न पडत आणि त्यांचं मन त्या विरुद्ध बंड करून उठे; पण चर्चा करणार कोणाशी ? वडिलांशी तर संवाद नव्हताच. आई बहाद्दर मनाची होती.

लहानपणी बाबा आईबरोबर दळण–कांडत बसत. सडा घालत. रांगोळी काढत. मग 'दळुबाई' अशी त्यांची ओळख होती. वडिलांना ते मुळीच खपत नसे. पुढे बाबा वेगळ्याच पद्धतीने वागू लागले. क्रांतिकारक वगैरे होणार अशी चिठ्ठी ठेवून गुपचूप पळून जाणे, मवाल्या गुंडांच्या घोळक्यात वावरणे, आखाडा पिसणे आणि कुस्त्या खेळणे, मारामारी आणि मासेमारी करणे वगैरे धंदे त्यांना लाजिरवाणे वाटत व त्यांचा संताप होई; पण अशा वेळी बाबा व त्यांचे वडील यांच्यात आई उभी राहात असे.

दुसऱ्याच्या दु:खात दु:खी होणं आणि त्या परिस्थितीत आपल्याजवळ जे जे आहे ते दुसऱ्याला देऊन टाकणं अशा प्रकारची सक्रिय सहानुभूती बाबांच्यात होती. दिवाळीत फटाक्यासाठी पैसे मिळाले ते घेऊन बाबा बाजारात गेले. फटाक्याच्या दुकानाशेजारी एक आंधळा भीक मागत होता उभे राहून. त्याचं दर्शन होताक्षणीच फटाक्यांसाठी नेलेले पैसे त्याच्या वाडग्यात बाबांनी टाकले. फटाके कशाला ? क्षणार्धात त्यांची राख होणार म्हणजे पैशाची राखच होणार. त्यापेक्षा आंधळ्याच्या पोटात आपल्या पैशांनी काही जाईल तरी असा विचार करणारे बाबा.

स्वसुखाकरिता आपल्या श्रीमंतीची ऐट करायची, त्यापेक्षा गरिबाला पैसे द्यावे असा विचार मनात आला तो लहानपणीच. मग द्यायचं ते सगळं देऊन टाकायचं, हातचं काही राखायचं नाही असा बाबांचा स्वभाव होत गेला. मोजून मापून, मतलब मनात ठेवून, दुसऱ्यांना दाखवण्यासाठी म्हणून स्वत:च्या जन्मजात औदार्याचं, अपार सहानुभूतीचं प्रदर्शन नाही. करायचं ते सर्वस्व ओतून. त्याग करायचा म्हणजे सर्वस्वाचा सहज त्याग अशीच त्यांची धारणा होती. पुढील आयुष्यात त्याचा प्रत्यय नेहमीच येत गेला.

बाबांचं प्राथमिक शिक्षण वरोड्याला झालं. सुटीच्या दिवसात रानावनात भटकंतीचा छंद. त्यातून आदिवासी जीवन व माणसं याबद्दल विलक्षण आपुलकी वाटू लागली. त्याच काळात पुढे भसरागडला जाऊन आल्यावर 'या भूमीसाठी मी काहीतरी करीनच' असा निर्धार करूनच परतले. हेमलकशाच्या 'लोक बिरादरी' या त्यांच्या प्रकल्पाचा उगम माडियांबद्दलच्या सहानुभूतीतच आहे.

सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर बाबांच्या वडिलांनी नागपूरला धरमपेठेतील उच्चभ्रू वस्तीत बंगला बांधला आणि बाबांच्या नागपूर येथील वास्तव्याला सुरुवात झाली. त्यांचं हायस्कूल व कॉलेजचं शिक्षण तिथंच नागपूर येथे झाले. शाळेत जाताना घोडागाडी आली. कॉलेजला जाताना मोटारगाडी आली. उंची कपडे आले. बाहेर खाण्यापिण्यासाठी खिशात भरपूर पैसे असत; पण बाबांना अभ्यासापेक्षा अभ्यासेतर विषयांत आणि उद्योगात त्यांचे जास्ती लक्ष असे. नवे छंद तयार झाले. शिकार करणे, मैफिलीला हजेरी, चित्रपटांची आवड व तीन तीन वेळा एखादा चित्रपट पाहिला जाई. शिकारीसाठी गेल्यावर मित्रांबरोबर मांसाहार, मद्य वगैरेही करण्यात

ते मागे राहिले नव्हते. ढाण्या वाघाच्या शिकारी केल्या, मचाणावरून नव्हे तर समोरासमोर, दारू प्याले. पण सोडलीही निर्धाराने. त्यानंतर थेंबालाही शिवलो नाही. मांसाहार केला बारा वर्षे न चुकता; पण मर्त्याचे शवभक्षण (डेड ईटींग डेड) हे कळून आले तेव्हा सोडला तर सोडलाच. असे हे बाबा मन मानेल ते केलं पण मनाने नाकारलं तेव्हा सर्वच सोडलं ते अखेरपर्यंत. मोहावर विजय मिळवणे, निर्धार केल्यावर तो तंतोतंत पाळणे सगळंच आगळं वेगळं, धाडसी नि माणुसकीचा झरा असलेले बाबा !

वयाच्या अकराव्या वर्षी 'गीतांजली' हातात पडल्यावर त्यांनी बंगाली भाषा शिकून घेतली होती. आता खुद्द त्या महाकवीला, रविंद्रनाथांना भेटण्यासाठी शांतिनिकेतनची वारी केली. तिथं रविंद्रनाथांशी चर्चा केली आणि त्यांचं प्रेम मिळवलं.

बाबा मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची इच्छा होती डॉक्टर होण्याची. त्या दृष्टीने त्यांचे कॉलेजचे प्रवेशाचे बेत चालले होते; पण वडिलांची इच्छा बाबांनी वकील व्हावे अशी होती. वडील त्यांच्या मताबद्दल आग्रही तर बाबा आपल्या मताबद्दल. वडलांच्या इच्छेविरुद्ध काही करणं शक्यच नव्हतं. म्हणून १९३४ मध्ये त्यांनी बी.ए.ची पदवी मिळवली आणि लगेच सरकारी विधी महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९३६ साली त्यांना कायद्याची पदवी मिळाली आणि बाबा वकील झाले. डॉक्टर होऊन आपल्या समाजाची सेवा करण्याची इच्छा केवळ वडिलांच्या इच्छेमुळे सोडून द्यावी लागली हे शल्य त्यांच्या मनात राहिलेच. वकील होऊन बाबा त्या व्यवसायाकडे वळले; पण फौजदारी दाव्यातील अशील, वकील, साक्षीदार इत्यादींची वृत्ती व व्यवहार पाहून बाबांना उबग आला. त्यांनी तसे नागपुरास येऊन वडिलांना सांगितले; पण ते त्यांना पटेना. अखेर बाबा दुर्ग येथील वकिली सोडून ते वरोड्याला आले. ते वरोड्याला एका दशकानंतर आले.

वरोड्यात वकिली सुरू केली. मात्र झाडूवाले, भंगी, विणकर, यांच्या संघटना बांधण्यास सुरुवात केली. वंचितांच्या, उपेक्षितांच्या संघटना बांधण्याशिवाय त्यांना आपले हक्क मिळविता येणार नाहीत या हेतूने त्यांनी हे काम सुरू केले. मात्र वकिलीत मन रमत नव्हते हे तितकेच खरे.

या काळात बाबा स्वत:चा शोध घेत राहिले. यासंबंधी दादा धर्माधिकारी म्हणतात, ''उत्कटता आणि उत्साह हे त्यांचे स्वभावविशेष, त्यात प्रेरणा आणि उदात्त भावना असते. त्यांच्या तल्लख व तीव्र मनाला ज्या वेळी स्पर्श करील त्याच्याशी त्यांची वृत्ती तत्क्षणी तल्लीन होते आणि त्या संवेदनेच्या पोटी प्रखर पराक्रमाचा जन्म होतो.''

क्रांतिकारकाच्या संपर्कात आल्यावर ते सशस्त्र क्रांतीचे उपासक झाले. मात्र जेव्हा त्यांच्या लक्षात आलं की त्या तत्त्वज्ञानात भारतीय समाजक्रांतीची बीजे आढळत नाहीत. सशस्त्र क्रांतीच्या

मर्यादा लक्षात आल्या. त्यासंबंधी भ्रमनिराश बाबा त्या काळात गांधीजींच्या विधायक, रचनात्मक कार्याकडे वळले. उसळत्या उत्साहाला, खदखदणाऱ्या असंतोषाला, क्रांतीच्या आकर्षणाला आता शांतीचा, विधायकतेचा अंकुश निर्माण झाला. गांधीजी, टागोर आणि विनोबा भावे यांचे जिवंत अध्यात्म हे त्यांच्या वाटेवरील प्रकाशाचे स्तंभ झाले.

बाबांनी वकिली सोडली. वडिलोपार्जित इस्टेटीवर पाणी सोडले. मात्र ते आता म्युनिसिपॅलिटीतील कामात सक्रिय झाले. ते तिथे उपाध्यक्षपद भूषवित होते. भंगी कामगार युनियनचेही ते अध्यक्ष होते. एकदा भंग्यांनी सेवाशर्तीतील सुधारणा व वेतनवाढीसाठी संप पुकारला. तेव्हा बाबांनी त्यांच्याशी बोलणी केली. चर्चेच्या वेळी संपकरी त्यांना म्हणाले, ''आम्हाला दररोज जे घाणेरडं काम करावं लागतं ते तुम्ही करू शकाल काय ? पाऊस पडत असताना डोक्यावरून मैला वाहून नेल्यावरच तुम्हाला आमचं काम कसं असतं ते कळू शकेल.'' बाबांनी ते आव्हान स्वीकारलं आणि भंगीकाम करण्यास पुरेसा वेळ देता यावा म्हणून ते पहाटे तीन वाजता उठत आणि ४ वाजल्यापासून आठ वाजेपर्यंत गावातील संडास साफ करण्याचे म्हणजे मैला वाहून नेण्याचे काम करीत तेही अनुभवाच्या तळमळीतून.

रिपरिपणाऱ्या पावसात संडास साफ करून मैला वाहून नेण्याचे काम करीत असताना एक नाक, कान झडून गेलेला तुळशीराम नावाचा कुष्ठरोगी गटारात पडलेला त्यांच्या दृष्टीस पडला. त्याच्या अंगावरील जखमांमधून अळ्या बाहेर पडत होत्या. क्षणभर बाबांना भीती वाटली. त्याच्या अंगावर एक तरट टाकून ते निघून गेले. परंतु रात्रभर अस्वस्थच. कुटुंबातील कुणाला कुष्ठरोग झाला तर माझे कर्तव्य काय राहील ? अशासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधत राहिले. तत्काळ उत्तरे सुचली नाहीत. मात्र काही दिवसांच्या आत्मचिंतनातून तुळशीरामच्या रूपानं त्यांच्यापुढं त्यांचं जीवितकार्य स्पष्टपणं उभं राहिलं. रस्त्यात पडलेल्या महारोग्याचे दर्शन आणि तोच त्यांच्या जीवनातला साक्षात्काराचा क्षण होता. त्यांच्या खळखळत्या जीवनप्रवाहाला एक नवं वळण, नवी दिशा मिळाली. जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांनी क्षण पकडला. कुष्ठरोग्याविषयीची भीती नाहीशी करण्याचं आणि कुष्ठरोग्याला त्याचा हरवलेला आत्मविश्वास, विसरलेला आत्मसन्मान आणि त्याला दर्शन झालेलं त्याचं आत्मसामर्थ्य परत मिळवून द्यायचं त्यांनी ठरवलं.

कुष्ठरोग्यांची सेवाच नव्हे तर त्यांना त्या रोगापासून मुक्त करण्यासाठी त्या रोगाविषयी शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी 'स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन' कलकत्ता येथे जाण्याचे ठरवले. तेथे अभ्यासक्रम पदविका असा होता; पण तेथील शिक्षण हे वैद्यकीय पदवीधरांसाठीच होतं. बाबांना प्रवेश कसा मिळणार ? परंतु पंतप्रधान नेहरूंच्या मध्यस्थीनं बाबांना प्रवेश मिळाला. त्यांनी तो अभ्यासक्रम पूर्ण केला.

अर्थात कुष्ठरोग्यांसाठी कार्य करता यावे म्हणून दत्तपूर येथे कुष्ठधाम सुरू केले. तत्पूर्वी बाबांचा विवाह पूर्वीच्या इंदू घुले आणि आत्ताच्या साधना यांच्याशी झाला. तो विवाह अगदी आगळा वेगळा. साधनाताईंच्या वडील बहिणीच्या निमित्ताने बाबांचा त्यांच्या घरी आठ दिवस मुक्काम होता. बाबा त्यावेळी लांब दाढी, पूर्ण पाठभर दाट जटा, हातात केनवजा काठी आणि खांद्यावर एका सामानाची थैली व घोंगडे अशा वेशात तेथे गेलेले. साधनाताईंचे वडील स्वर्गवासी झाले होते. वयाच्या तिसाव्या वर्षीच त्यांच्या आईवर संसाराचा भार होता. बहिणीच्या लग्नाच्या वेळी बाबा त्यांच्या घरात मुक्कामाला आणि बाबा प्रतिष्ठित म्हणून त्यांची काळजी घ्यायला इंदू घुले ऊर्फ साधना आमटे विवाहानंतरच्या. लाजरेबुजरे, स्त्रीशी न बोलणारे बाबा. इंदू घुलेंशी विवाह झाला १८ डिसेंबर १९४६ रोजी. त्यांचे सहजीवनही आगळे वेगळे. वरोड्याला संसार सुरू झाला; पण ते घर म्हणजे संन्याशाची मठी. संध्याकाळी स्वयंपाक केला दोघांनी मिळून. बाबांना पुरुषांचीच नव्हे तर स्त्रियांची सुद्धा सर्व कामे येत.साधनाताईंची प्रेमाची ज्योत आणि बाबांचा पुरून उरेल एवढा स्नेह यांच्या मांगल्य मीलनाच्या प्रकाशाने त्या दोघांच्या सर्व दिशा व्यापून गेल्या. एक आगळेच चैतन्य आले.

दत्तपूर येथे कुष्ठरोग्याच्या सेवेच्या अनुभवाच्या बळावर त्यांनी वरोड्याच्या सरकारी हॉस्पिटलबाहेर कुष्ठरोग्यांना तपासण्याचे आणि सल्ला देण्याचे केंद्र उघडले. तिथे मोठ्या संख्येने कुष्ठरोगी येत. या कामात व्यग्र असलेल्या बाबांना साधनाताईंच्या प्रकृतीची चिंता लागली. त्या एकतर गरोदर, त्यातच विषमज्वर झालेला. जेवण बनवणं, भांडी घासणं, लहान मुलांची काळजी घेणं या सगळ्या गोष्टी बाबांच्या अंगावर पडल्या. १९४८ च्या डिसेंबर महिन्यात बाबांच्या दुसऱ्या मुलाचा, प्रकाशचा जन्म झाला. साधनाताईंची प्रकृती आणखी खालावली. क्षयरोगाचे निदान झाले. मग दत्तपूरच्या नव्याने बांधल्या जात असलेल्या सुतिकागृहाच्या आवारातील मोकळ्या जागेत बाबांनी एक तंबू ठोकला व त्यात पुढील दोन महिने आजारी पत्नी व दोन लहान मुलांना घेऊन ते राहिले. कारण क्षयरोगी पत्नी म्हणून राहावयास खोली मिळेनाच. मग असा हा संसार थाटला बाबांनी.

बाबांनी १९४९ च्या दरम्यान 'महारोगी सेवा समिती' स्थापन केली. या काळातच त्यांनी वडिलोपार्जित इस्टेटी व मिळकतीवरचे सर्व हक्क सोडून दिले. वकिली तर आधीच सोडली होती. त्यामुळे संसार कसा असेल याची कल्पना केलेलीच बरी. आता त्यांच्याजवळ कुष्ठरोग्यांसंबंधीचे कार्य करण्याच्या तळमळीशिवाय काहीही उरलं नव्हतं. महारोगी सेवा समिती ही १९५१ मध्ये नोंदणीकृत सोसायटी झाली. समितीला तत्कालीन मध्य प्रदेश शासनाकडून त्याच वर्षी चंद्रपूर–नागपूर रस्त्यानजिक आणि वरोड्यापासून ५ किलोमीटर अंतरावर ५० एकर जमीन मिळाली. हे पुढे येणाऱ्या शुभ घटनांचं प्रसादचिन्ह होतं. बाबा व साधना आमटे यांच्या खडतर जीवनात आनंदमेघांनी केलेला तो सुशीतल शिडकावा!

शासनाकडून मिळालेली ५० एकर जमीन दगडगोट्यांनी, झाडाझुडपांनी व्यापलेली होती. ती वसाहतीसाठी व शेती करण्यासाठी योग्य बनविण्याचे दृष्टीने भगीरथ प्रयत्न सुरू झाले. कामाला होती माणसं सात. एक बाबा व सहा कुष्ठरोगी आसपास पाण्याची सोय नसल्याने विहीर खणण्यासाठी हे सात वीर कामाला लागले. विहीर खणण्याची साधनं आणि हृदयात होती अदम्य इच्छाशक्ती–तीस फूट खणणं खाली गेलं तरी पाणी दिसेना; पण अचानक जलदर्शन झाले आणि त्यांचा आनंद गगनात मावेना. अतिशय उत्साह पालवणारा. बाबा म्हणाले, ''बहिष्कृत जमिनीवर, बहिष्कृत लोकांनी घडवलेला तो चमत्कार होता.'' शिवाय इथल्या विहिरीत जेवढं पाणी मिळालं त्यापेक्षा जास्त घाम त्या विहिरीत खणण्यात जिरलेला.

निवासासाठी कामचलाऊ एक झोपडी. दुसरी झोपडी बांधेपर्यंत बाबा व साधनाताई यांची रोज अडीच–तीन पायपीट तेथे पोहोचण्यासाठी. सोबत जेवणाचा डबा, पाणी, मुलांना थोडं चालवत व थोडं कडेवर घेऊन आनंदवनचे जंगल गाठावे लागे. सायकल देखील दुर्लभ, साधनाताई व बाबा यांनीच कुष्ठरोग्यांचे जेवण तयार करायचे. भांडी, धुणी, विहिरीचं पाणी काढणं, हातसडीचे तांदूळ,पीठ बेसन घरी दळणे ही कामे आनंदाने उभयता करीत.किती खडतर कष्टप्रद जीवन ! शिवाय भरीत भर म्हणून वाघ, चित्ते होते पण साप, विंचू यांचं तर ते माहेरघर होतं.

कामचलाऊ झोपड्या झाल्यावर नव्या वसाहतीचे 'आनंदवन' चे उद्घाटन आचार्य विनोबा भावे यांच्या हस्ते २१ जून १९५१ रोजी झाले. 'आनंदवन' नाव साजेसं व सार्थकी. भिक्षापात्राऐवजी श्रम–अशी श्रमाची महती. कुष्ठरोग्यांची वसाहत, कुष्ठधाम, कुष्ठरोग्यांचे निवासस्थान असे न म्हणता जणू इथे श्रमाचं, सेवेचं रामायण लिहिलं जात राहिलं.

'आनंदवन' चं कुष्ठरोग्यांचं काम सुरू झालं. औषधोपचाराची जबाबदारी बाबांच्यावर होती. ते प्रशिक्षित आरोग्यसेवक पण प्रत्यक्षात त्यांनाच सर्व तऱ्हेची कामे करावी लागत. आनंदवनात १९५६ साली पंजाब, हरियाणातून गायी आणल्या. गाईंची जबाबदारी प्रामुख्याने साधनाताईंवर पडली. महारोग्यांविषयी गैरसमज असल्याने दूध काढणारा नोकर मिळेना. गाईंच्या कासी तर तट्ट ताठलेल्या. शेवटी बाबा व साधनाताई यांनाच सरसावे लागले. गाईचे पाय बांधून दूध काढणं सुरू झालं. हाताची नस न् नस ठणकू लागली. गाईच्या लाथा खाल्ल्या; पण प्रयत्नांती सगळं जमू लागलं. साधनाताई तर निष्णात झाल्या.

आनंदवनात भाजीपाला पिकवला जाऊ लागला. साठ कुष्ठरोगी झाले. मात्र त्यांनी पिकलेला भाजीपाला वरोडा येथील बाजारपेठेत नेला जाई; पण सुरुवातीला कुष्ठरोगी तो पिकवतात म्हणून गिऱ्हाईक मिळेना. हळूहळू मालाचा उत्कृष्ट दर्जा, रास्त किंमत, गावातील समजदार माणसांनी मुद्दामच आनंदवनची भाजी खरेदी करण्याचे धाडस दाखविल्याने विक्री वाढू लागली. आर्थिक फायदा दिसू लागला. कुष्ठरोगी आता दयापात्र, आत्मविश्वास गमावून

बसलेला. हताश माणूस उरलेला नाही. त्याला आपल्या सर्जनशीलतेचा, सामूहिक प्रयत्नांचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. बाबा सतत त्यांचे प्रबोधन करीत.

बाबा आमटेंच्या प्रयत्नांनी आनंदवनच्या तीस मैलाच्या परिसरात ११ उपचार केंद्रं स्थापन झाली. त्या प्रत्येक केंद्राला आठवड्यातून बाबांची एक भेट होत असे आणि रोग्यांवर उपचार ते स्वत: करीत. त्या काळात बाबांचा दिवस सुरू व्हायचा पहाटे ३ वाजता. बरोबर ४ वाजता जेवणाचा डबा घेऊन ते निघत. साधनाताई वेळच्या वेळी डबा करून देत. बाबांना विलंब खपत नसे. कुष्ठरोग्यांवर इलाज करण्यासाठी एखाद्या पदवीधर डॉक्टराच्या शोधात बाबा होते. पुष्कळ प्रयत्न केला पण व्यर्थ. समर्पित वृत्तीने प्रशिक्षित कार्यकर्ता कुष्ठरोगी बरा करू शकतो याचे उत्कष्ट उदाहरण म्हणजे बाबा आमटे.

१९७४ मध्ये डॉ. विकास आमटे बाबांचे चिरंजीव बाबांच्या या कार्यात सामील झाले. हॉस्पिटलची जबाबदारी त्यांनी अंगावर घेतली. त्यांनी नागपूर वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. ची पदवी घेतली होती आणि चिंगलगूट हॉस्पिटलमध्ये कुष्ठरोगाचं प्रशिक्षण पूर्ण केलं होतं. यावेळपर्यंत आनंदवन, अशोकवन, सोमनाथ कुष्ठकार्य सुरू झालं. डॉ. प्रकाश आमटे आणि त्यांची पत्नी मंदाकिनी आमटे या दोघांनीही याच कामात स्वत:ला झोकून दिले.

आनंदवनातील कुष्ठरोग्यांची संख्या १९९५-९६ मध्ये १५७१ होती. बाबांनी सुरू केलेले कुष्ठरोग्यांवरील उपचार व त्यांच्या उत्पादनाधारित पुनर्वसनाचं कार्य नवी पिढी समर्थपणे सांभाळत आहे. नव्हे त्याला नवा आकार, नवा आशय , नवी दिशा देत आहे आणि तेही बाबांच्याच समर्पण वृत्तीने.

खडकाळ जमिनीच्या आनंदवनात बाबांनी नंदनवन फुलविले. बाबा सांगतात, ''माळरानावर हिरवी राने डोलू लागली. गिट्टीच्या खदानीतून पाचूचे बेट आणि सुखसदने निर्माण झाली. वेदनेचा पहाड कोरता कोरता त्यांना आढळून आले, आपण हे सौख्याचे कैवल्यलेणे कोरीत होतो.''

राहाण्याकरिता इमारती, पाहुण्यांकरिता अतिथीगृहे, शाळा, कॉलेज, उद्योगभवन इत्यादि आधुनिक संस्कृतीचे दृश्य आनंदवनात निर्माण झाले. देशीविदेशी पाहुण्यांची वर्दळ वाढली. विदेशांमध्ये बाबांचे कार्य जाऊन पोहोचले. धान्ये, कडधान्ये, तेलबिया, भाजीपाला, फळझाडे, बीजोत्पादन प्रकल्प, नगदी पिके, वनौषधी शेती, वनशेती (२५ प्रकारच्या उपयुक्त वृक्षांची लागवड), गवताची शेती, फूलशेती, नर्सरी आणि रेशीम किडा पालन-मधुमक्षिका पालन-गो पालन, मत्स्यपालन आणि कुक्कुट पालन इत्यादी उत्पादने, व्यवसाय २६५ एकर जमिनीवर बहरलेला. ते पाहून आनंदवनाला आचार्य अत्रे यांनी १९६० साली भेट देऊन 'मराठा' वृत्तपत्रात सुंदर संपादकीय लिहिले. ''आनंदवन म्हणजे भारतातील एक चमत्कार' अशी सुरुवात करून गौरवोद्‌गार काढले. कृषी विकास व शेती आधारित उद्योगाचा हा समूह म्हणजे महारोग्यांच्या

कर्मयज्ञातून बाबांच्या नेतृत्त्वाखाली अखंड परिश्रम, दुर्दम्य आशावाद, शून्यातून शिखर गाठण्याची किमयाच होय.

''बाबा आमटे म्हणजे विलक्षण सामर्थ्याचा नि योग्यतेचा महापुरुष आहे, आणि त्यांचे 'आनंदवन' म्हणजे मानवतेचे महन्मंगल तीर्थक्षेत्र आहे!'' असे उद्‍गार स्वित्झर्लंडमधील भारतीय राजदूतांनी काढले. तीस हजाराची देणगी दिली. बाबा आमटेंना निरोप देताना कडाडून मिठी मारून ते म्हणाले, ''या आनंदवनात तुम्ही महारोगाला खरोखर गाडून टाकले आहे!''

तेव्हा महर्षि आमटे यांच्या तोंडून ईश्वरी वाणी उचंबळली, ''जेथे भीती तेथे प्रीती नसते. अंत:करणातून भीतीला हाकलून दिल्याखेरीज मानवावर प्रीती करता येत नाही!''

बाबा आमटेंचे कार्य सर्वदूर पोहोचले. आंतरराष्ट्रीय सहकार्याचा ओघ सुरू झाला. आनंदवनाचा झालेला विकास 'विलक्षण' या एका शब्दाने वर्णन करता येऊ शकेल. इमारतीमागून इमारती झाल्या. विहिरीमागून विहिरी खोदल्या गेल्या, दगडधोंड्यांच्या जमिनींना सस्यशामल धरणीचे रूप आले. उत्पादनाचे डोंगर निर्माण होऊ लागले.

वरोड्याच्या महारोग्यांच्या वसाहतीला आणखी एक वरदान मिळाले व ते म्हणजे तिथे टिन कॅन प्रकल्प सुरू झाला. स्वित्झर्लंडमधील भारताचे वकील श्री. वेलोदी यांच्या पत्नी बर्न यांनी आनंदवनाची माहिती घेतली. त्यांनी 'आऊसलँड इल्फ'कडे मदतीसाठी शिफारस केली. स्विस संस्थेने आपल्या प्रतिनिधीमार्फत सर्व माहिती मिळवून ३० हजार स्विस फ्रँकची देणगी दिली. त्यातून २८ नोव्हेंबर १९६० ला 'टिन कॅन प्रोजेक्ट' चे औपचारिक उद्‍घाटन झाले. त्यातून उत्पादित झालेल्या वस्तू परिसरातील गावात जाऊ लागल्या.

'संधिनिकेतन' हे असेच एक पोलिओपीडित तार्नोव्हस्की या गृहस्थांनी दिलेल्या इंग्लंड रहिवासी यांच्या मदतीतून आनंदवनात सुरू झाले. ते 'रिडर डायजेस्ट ग्रुप' तर्फे जगभर प्रवास करीत. १९६८ साली ते आनंदवनात आले आणि बाबांचे सच्चे मित्र झाले. शारीरिक विकलांगांसाठी विविध कौशल्ये प्राप्त करून द्यावीन म्हणून 'संधिनिकेतन' निर्माण करण्यासाठी दीड लाख रुपये आनंदवनला दिले. त्यातून संधिनिकेतनची इमारत उभी राहिली. कुष्ठमुक्त, अंध, मूक, बधीर, अपघातग्रस्त अशा सर्वांना संधिनिकेतमध्ये अर्थार्जनाचे एखादे कौशल्य प्राप्त करण्याची, व्यवसाय शिक्षणाची संधी मिळते. त्यात सुतारकाम, लोहारकाम, प्लंबिंग, प्रिटिंग, शिवणकला, चामड्याच्या वस्तू बनविणे, भेटकार्ड, वेतकाम, विणकाम, विटा बनविणे वेल्डिंग काम इत्यादी विविध उद्योगांचे शिक्षण मिळते आणि अर्थार्जनाची संधीही मिळते. वस्त्रोद्योगही सुरू झाला.

दसऱ्याच्या मुहूर्तावर १९६३ साली चिमूर–नागपूर रोडवर आनंदवनच्या शेजारी सायन्स कॉलेज बाबांनी सुरू केले. आजूबाजूच्या मुलांच्या व मुलींच्या कॉलेज शिक्षणाची सोय